महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


=====================================================================

जावक क्रमांक – ७३१/३५ दिनांक :- २४ मार्च , २०२५

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा' छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे २८ मार्च रोजी पहिल्या जनता दरबार दिनाचे आयोजन

## 'म्हाडा'चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांच्या कृती आराखड्याची तात्काळ अंमलबजावणी

मुंबई, दि. २४ मार्च, २०२५ :- नागरिकांच्या तक्रारींची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून म्हाडा मुख्यालयात राबविण्यात येणाऱ्या लोकशाही दिनाप्रमाणे म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ स्तरावर पहिल्या जनता दरबार दिनाचे दि. २८ मार्च २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनिक विभागांकरिता मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार व राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या सूचनेनुसार १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. म्हाडाच्या सर्व विभागीय मंडळांनी १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्यातील "नागरिकांच्या तक्रारींचे निवारण" या महत्त्वपूर्ण घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनता दिन आयोजित करावा, असे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी दिले होते. या निर्देशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक मंडळ स्तरावर नुकताच पहिला जनता दरबार दिन घेण्यात आला. जनता दरबार दिन आयोजित करणारे छत्रपती संभाजीनगर मंडळ हे म्हाडाचे दुसरे विभागीय मंडळ आहे.

छत्रपती संभाजीनगर मंडळाचे मुख्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मंडळाच्या सी.बी.एस. रोड, महावीर स्तंभाजवळ, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयात सदर जनता दरबार दिन होणार आहे. मंडळाअंतर्गत मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील गाळेधारक, भूखंडधारक, सदनिकाधारक यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, गाळे, भूखंड, सदनिकांबाबत समस्या व अडी-अडचणीबाबतचे म्हणणे मांडण्यासाठी आपले लेखी निवेदन, अर्ज मंडळाकडे दिनांक २७ मार्च २०२५ पर्यंत सादर करण्यात यावे, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

Outward No. : 731/35 Dt. March 24, 2025

Press Release

# MHADA Chhatrapati Sambhajinagar Board to hold first Janata Darbar Din on March 28

Implementation of 100-Day action plan as directed by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, VP & CEO, MHADA

Mumbai, March 24, 2025: MHADA Chhatrapati Sambhajinagar Housing and Area Development Board will conduct its first Janata Darbar on March 28, 2025, to ensure timely and effective resolution of public grievances. This initiative follows the Lokshahi Din model at MHADA Headquarters, aimed at making the grievance redressal process more accessible and responsive.

As per the directives of Hon'ble Chief Minister Shri. Devendra Fadnavis and under the guidance of Deputy Chief Minister & Housing Minister Shri. Eknath Shinde, a 100-day action plan has been enforced across all administrative departments. Under this plan, citizen grievance redressal has been prioritized, and accordingly, Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President & CEO, MHADA has instructed all regional boards to conduct Janata Darbar Din for direct resolution of public concerns.

Following the successful conduct of the first Janata Darbar Din at the MHADA Nashik Board, the Chhatrapati Sambhajinagar Board will now hold its own public forum for grievance resolution. The Janata Darbar Din at Chhatrapati Sambhajinagar will be chaired by the Chief Officer of the Board and will take place at the Board's Office, CBS Road, near Mahavir Stambh, Chhatrapati Sambhajinagar.

A public notice is issued to all shop owners, plot holders, and flat owners across all districts in the Marathwada region under the Board's jurisdiction. Concerned individuals must submit written applications along with necessary supporting documents to the Board by March 27, 2025. For further details, applicants are advised to contact the Board office.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial